CNR No. : MHWR010000562026

**निशाणी क्र. १ खालील आदेश.**
**(पारित दि. १८/०७/२०२६)**

१) सदरचा अर्ज हिंदू अज्ञानत्व व पालकत्व अधिनयम चे कलम ८(२) प्रमाणे मौजा शहापूर, ता. आर्वी, जिल्हा वर्धा येथील शेत क्र. ३८ मधील अर्जदार क्र. २ चा हिस्सा विकण्याची परवानगी मिळण्याकरिता केला आहे.

२) अर्जदाराचे कथन थोडक्यात असे की;

अर्जदार क्र. १ ही अर्जदार क्र. २ ची नैसर्गिक अज्ञान पालनकर्ती आहे. अर्जदार क्र. १ चे पती मनोज अजमीरे यांचा मृत्यू झाला असून ते एकमेव कमविते व्यक्ती होते. त्यामुळे आता अर्जदाराकडे उत्पन्नाचे कुठलेही स्वतंत्र साधन उपलब्ध नाही. अर्जदार क्र. १ वर अर्जदार क्र. २ चे पालन पोषण, संगोपन आणि शिक्षणाची जबाबदारी आहे. अर्जदार क्र. १ यांचे पतीचे नावे मौजा शहापूर, तालुका आर्वी, जिल्हा वर्धा येथे शेत क्र. ३८, आराजी १.२० हे.आर. त्याचा भाउ अरविंद अजमीरे, किशोर अजमीरे आणि प्रदीप अजमीरे यांच्या सहमालकीने आहे. सदर शेत जमीनीच्या महसुल अभिलेखामध्ये अर्जदार क्र. १ च्या पतीच्या निधनानंतर अर्जदारांचे नाव वारसा हक्काने लागलेले आहे आणि त्याबाबत फेरफार झालेला आहे. त्याप्रमाणे अर्जदार यांनी ते मयत मनोज अजमीरे यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र आर्वी न्यायालयामधून प्राप्त केले आहे. अर्जदार क्र. १ कडे अर्जदार क्र. २ चे संगोपन, पालन पोषण आणि शिक्षण, तसेच औषधोपचाराकरिता कुठलेही उत्पन्नाचे स्वतंत्र साधन नसल्यामुळे आणि उपरोक्त शेती वाहितीस उपयोगाची नसल्याने दुसरी शेती विकत

घेण्याकरिता मयत मनोज अजमीरे, अरविंद अजमीरे, किशोर अजमीरे आणि प्रतिक अजमीरे यांनी सदर शेती दुस—या व्यक्तीला विकण्याचा सौदा इसारचिठ्ठीद्वारे दि. २३/११/२०२० रोजी केलेला आहे. त्यामुळे सदर शेतीमधील अर्जदार क्र. २ चा हिस्सा विकण्याची परवानगी आवश्यक आहे. करिता प्रस्तुत अर्ज सादर केला आहे.

**३)** गैरअर्जदारातर्फे न्यायालयामार्फत नोटीस काढूनही आणि त्याची तामीली होवूनही कुणीही हजर राहून उजर घेतला नाही. त्यामुळे नि.क्र. १ वर आदेश पारित करुन प्रस्तुतचा अर्ज एकतर्फा चालविण्यात आला.

**४)** अर्जदाराचे अभिकथन आणि पुरावा विचारात घेता खालील मुद्दे उपस्थित होतात. माझा निष्कर्ष कारणासह खालील प्रमाणे आहे:

| **अ.क्र.** | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १. | अर्जदार हे हिंदू अज्ञानत्व व पालकत्व अधिनयम चे कलम ८(२) प्रमाणे मौजा शहापूर, ता. आर्वी, जिल्हा वर्धा येथील शेत क्र. ३८ मधील अर्जदार क्र. २ चा हिस्सा विकण्याची परवानगी मिळण्यास पात्र आहे का? | | **होकारार्थी.** |
| २. | काय आदेश? | | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

**<u>कारणमिमांसा</u>**

**<u>मुद्दा क्र. १ बाबत:</u>**

**५)** अर्जदारांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केलेला असून अर्जाच्या समर्थनार्थ काही कागदपत्रं अभिलेखावर दाखल केलेले आहेत ते म्हणजेच अर्जदार क्र. १ च्या आधार कार्डची पडताळलेली प्रत, अर्जदार क्र. २ च्या आधार कार्डची पडताळलेली प्रत, अर्जदार क्र. १ चे

पती मनोज अजमीरे यांचे मृत्युप्रमाणपत्र, शेतजमीन भूमापन क्र. ३८ चा ७/१२ उतारा, शेतजमीन भूमापन क्र. ३८ चा फेरफार, शेतजमीन भूमापन क्र. ३८ ची इसारचिठ्ठी आणि वर्तमानपत्रामध्ये जाहीरात प्रगट केल्याबाबत वर्तमानपत्र.

**६)** वर नमूद अर्जदाराच्या शपथपत्रामधील कथन आणि दस्ताऐवजाचे बारकाईने अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, शेतजमीन भूमापन क्र. ३८ ही महसूल अभिलेखाप्रमाणे अर्जदार क्र. १, अर्जदार क्र. २ आणि अर्जदार क्र. १ चे पती मनोज अजमीरे यांचे भाउ यांच्या संयुक्त नावावर आहे. सदर शेतजमीन विकण्याची इसारचिठ्ठी सुध्दा झालेली आहे. वर्तमानपत्रामध्ये जाहीरात प्रगट करुनही कोणीही हजर होवून अर्जदारांच्या मागणीचे खंडन केले नाही. त्यामुळे या सर्व बाबींचा विचार करुन मी या निष्कर्षास आलो आहे की, उपरोक्त शेतजमीनीमधील अर्जदार क्र. २ चा हिस्सा त्याच्या हितासाठी आणि कल्याणासाठी विकण्याची परवानगी मिळण्यास अर्जदार पात्र आहे. करिता मी मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष होकारार्थी देत आहे आणि मुद्दा क्र. २ करिता खालील आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. अर्जदार यांना हिंदू अज्ञानत्व व पालकत्व अधिनियम चे कलम ८(२) प्रमाणे मौजा शहापूर, ता. आर्वी, जिल्हा वर्धा येथील शेत क्र. ३८ मधील अर्जदार क्र. २ चा हिस्सा विकण्याची परवानगी देण्यात येते.

३ अर्जदार क्र. २ च्या हिस्स्याची शेतजमीन विकून मिळालेला मोबदला हा केवळ अर्जदार क्र. २ च्या हितासाठी व कल्याणासाठी वापरावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by VISHAL ARVINDRAO SATHE
Date: 2026.07.18 17:52:11 +0530

(विशाल अ. साठे)
जिल्हा न्यायाधीश–४,वर्धा.

दि. १८/०७/२०२६

# C E R T I F I C A T E

I hereby affirm that the contents of this PDF file are a true and verbatim reproduction of the original order.

(Vinod M. Mandade)
Stenographer (Grade-I)